# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट २६६ - २३** **दिनांक : - १८/०८/२०२३**

## बांधकाम विकासकावर तलवारीने जिवघेणा हल्ला करुन खंडणी मागणा-या आरोपीतास अटक करण्यात पोलीसांना यश.

फिर्यादी श्री. जितेंद्र रमांकात यादव, व्यवसाय-बांधकाम विकासक हे दिनांक २१/०६/२०२३ रोजी रोजी त्यांचे बिंधशक्ती रियल इस्टेट अँन्ड इन्फ्रा प्रायवेट लिमिटेड ऑफीस जुचंद्र गांव, नायगाव पुर्व या ऑफिसमध्ये असतांना आरोपीत गिरीश नायर व त्याचे इतर साथीदर हे हातात तलवार व लोखंडी रॉडसह गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी यांचे कार्यालयात घुसुन कार्यालयाची तोडफोड करुन फिर्यादी यांचे कडे मागीतलेले खंडणीचे पैसे दिले नाही म्हणुन फिर्यादी यांचे ऑफिस मध्ये काम करणारे साक्षीदार याचे डोक्यात जीवे ठार मारण्याचे उद्देशाने तलवारीने वार करुन जखमी केले तसेच फिर्यादी यांचे पायावर तलवारीने वार करुन फिर्यादी व साक्षीदार यांना जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देवुन शिवीगाळ केले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १५५/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३०७, ३८६, ३२४, ४५२, १४३, १४७, १४८,१४९, ४२७, ५०४, ५०६, १२० (ब) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ सह शस्त्रबंदी अधिनियम १८७८ चे कलम ४,२५ प्रमाणे गुन्हा नोद आहे.

सदर दाखल गुन्हयाची मा. वरिष्ठांनी गंभीर दखल घेऊन गुन्हयातील आरोपीत निष्पन्न करुन त्यांचा शोध घेवुन अटक करणेकामी विविध पथके नेमण्यात आली होती. आरोपीत यांचा पुर्व गुन्हेगारी इतिहास व नमुद दाखल गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेऊन सदर गुन्हयातील अटक आरोपीत यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम कलम ३ (१) (i), ३ (१) (ii),३ (२), ३ (३), ३ (४) प्रमाणे (मकोका कायदया अंतर्गत) या वाढीव कलमांचा अंर्तभाव करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपीत नामे गिरीष कुमारन नायर हा गुन्हा दाखल तारखे पासुन आपले अस्तित्व लपवुन वास्तव्य करीत होता. तांत्रीक विश्लेषणाद्वारे व गोपणीय बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीच्या आधारे आरोपीत नामे गिरीष कुमारन नायर वय ३८ वर्षे, रा. फुलपाडा, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास गोरेगाव, मुंबई येथुन कौशल्यपुर्वकरित्या ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२, श्रीमती पद्मजा बढे, सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग, श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष -३ व नायगाव पोलीस ठाण्याचे संयुक्त पथकातील पो.नि. प्रमोद बडाख, स.पो.नि. रोशन देवरे, गणेश केकान, पो.उप.निरी. अभिजीत भुपेंद्र टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, चेतन ठाकरे, सचिन खाताळ, जैवंत खांडवी, अमर पवार, सचिन मोहीते यांनी केली आहे.

********